# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक:०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय:— वैयक्तिक लाभाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना...**

संदर्भ:— १. वित्त विभाग परिपत्रक क्र.सकीर्ण—२०२२/प्र.क्र.२७/अर्थबळ दि. ०४.०३.२०२४.
२. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं शिष्यवृत्ती/आ.का.संलग्न/२०२३—२४/३१४७१४ ईमेलद्वारे प्राप्त दि. १८.०३.२०२४.
३. महाडीबीटी—२०२३—२४/शिष्यवृत्ती शाखा/५२८६, दि. १८.०३.२०२४.

या परिपत्रकाद्वारे सर्व मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/मा. विभागप्रमुख सर्व शैक्षणिक विभाग यांना कळविण्यात येते की, महाडीबीटी पोर्टलवरील उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांकरीता विद्यार्थ्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जाची पडताळणी मंहाविद्यालय/परिसंस्था आणि विद्यापीठ विभाग स्तरावरून करून संबंधित योजना पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार कार्डशी संलग्नीकरण असलेल्या खात्यामध्ये वितरित करण्यात येते. त्यामुळे सर्व महाविद्यालयांनी वरील संदर्भीय पत्राचे अवलोकन करून महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र लाभार्थ्यांकरिता दि. ३०.०३.२०२४ पूर्वी आधार कार्ड सोबत संलग्नीकरण करण्याकरीता कार्यशाळा आयोजित करण्यात यावी व सर्व महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीकरीता ऑनलाईन अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड संलग्नीकरण करून घेण्यात यावे. तसेच आधार कार्डशी संलग्नीकरण करण्याची कार्यवाही १०० % पुर्ण झाल्याचे हमीपत्र संबंधीत कार्यालयास सादर करण्यात यावे. आपल्या स्तरावरून योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्या जेणे करून कोणताही पात्र विद्यार्थी (लाभार्थी) कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांची राहील याची नोंद घ्यावी, ही विनंती.

२२/३/२४
(श्री. मोहन बेलेकर)
सहायक कुलसचिव,

गणेशखिंड पुणे — ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/२३५ }
दिनांक : २२/०३/२०२४ }

**सोबत:** मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांचे दि. १८/०३/२०२४ रोजीचे पत्र

**प्रत:**
१. मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

संदर्भ क्र. १ च्या वित्त विभागाच्या परिपत्रकामध्ये उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे महाविद्यालय स्तरावरुन कार्यशाळा घेऊन योग्य ती कार्यवाही करणेबाबत सर्व महाविद्यालयांना गुगल मिट द्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. तरी सर्व महाविद्यालयांनी / संस्थांनी / विद्यापीठांनी सदर विषयाचे गांभीर्य विचारात घेऊन महाविद्यालयामध्ये महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन ॲप्लिकेशन केलेल्या सर्व पात्र लाभार्थ्यांकरीता दि. ३०.०३.२०२४ पूर्वी आधार कार्डसोबत संलग्नीकरणाची कार्यशाळा आयोजित करुन सर्व पात्र लाभार्थ्यांकरीता आधार कार्डसोबत संलग्नीकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच आधार कार्डशी संलग्नीकरण करण्याची कार्यवाही १००% पूर्ण झाली याचे हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे. अधिक माहिती करीता कृपया संदर्भ क्र. १ चे वित्त विभागाचे परिपत्रक आणि संदर्भ क्र. २ चे मा. शिक्षण संचालनालय यांचे पत्राचे अवलोकन करावे. तसेच योग्य ती कार्यवाही मुदतपूर्व पूर्ण करुन त्याचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. जेणेकरुन कोणताही पात्र लाभार्थी कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही. सदर कार्यवाही पूर्ण न केल्याने कोणताही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळण्यापासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य / विद्यापीठांचे कुलसचिव यांची राहील याची कृपया गांभीर्याने नोंद घ्यावी.

**(डॉ. केशव तुपे )**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

